ePaper

## प्रत्येक कुत्र्याचे दिवस येतात", संजय राऊत यांचा सत्ताधाऱ्यांना इशारा



| वर्ष - 6 । अंक - 286 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- कसब्यासाठी मविआत रस्सीखेच!
- संघर्ष होगा...लढाई आरपार!
- राज्यातील शिक्षकेतर कर्मचारी आंदोलनाच्या पवित्र्यात
- आसाराम बापूला जन्मठेपेची शिक्षा !

www.mahaenews.com | ।बुधवार, दि. 1 फेब्रुवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# आमदार बनसोडे यांचे 'बंड'?

## » मुख्यमंत्र्यांच्या गाडीत प्रवास : राष्ट्रवादीच्या पाया खालची वाळू सरकली

। पिंपरी । महाईन्यूज ।विशेष प्रतिनिधी ।

**चिंचवड विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असतानाच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला पिंपरी-चिंचवडमध्ये धक्का बसण्याची शक्यता आहे. पिंपरी विधानसभेचे आमदार अण्णा बनसोडे यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गाडीत प्रवास केला. त्यामुळे राष्ट्रवादीसह महाविकास आघाडीच्या गोटात खळबळ उडाली आहे.**



राज्यात महाविकास आघाडीची सत्ता असतानाच आमदार बनसोडे आणि राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांमध्ये दरी निर्माण झाली होती. शिंदे-फडणवीस सरकारच्या काळात बनसोडे राष्ट्रवादीच्या कार्यक्रमांमधून अलिप्त झालेले पहायला मिळाले. दरम्यान, चिंचवड विधानसभा मतदार संघाची पोटनिवडणूक घोषीत झाल्यानंतर दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या घराण्यातील उमेदवाराला बिनविरोध निवडून द्यावे, अशी अपेक्षा बनसोडे यांनी व्यक्त केली होती. यावरुन राष्ट्रवादीचे स्थानिक नेते आणि बनसोडे अशी दुफळी निर्माण झाली. राष्ट्रवादीतील स्थानिक नेत्यांनी बनसोडे यांच्यावर टीकाही केली होती. त्यामुळे बनसोडे नाराज असल्याबाबत चर्चा रंगली होती.

वास्तविक, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या शहराध्यक्षपदी अजित गव्हाणे यांनी नियुक्ती झाल्यानंतर शहर राष्ट्रवादीत ज्येष्ट- कनिष्ट असा नवा वाद निर्माण झाला. माजी आमदार विलास लांडे, माजी शहराध्यक्ष संजोग वाघेरे यांच्यासह ज्येष्टांना पक्षाच्या निर्णय प्रक्रियेत डावलल्याची भावना निर्माण झाली. त्यामुळे राष्ट्रवादीतील ज्येष्टांना मानणारा मोठा गट पक्षापासून अलिप्त राहू लागला. आमदार अण्णा बनसोडे यांची क्षमता असतानाही, त्यांना पक्षात डावलले जात आहे, अशी तक्रार राष्ट्रवादीच्याच पदाधिकाऱ्यांनी पक्षश्रेष्ठींकडे केली. बनसोडे यांची नाराजी ऐन पोटनिवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादीला परवडणारी नाही, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

विशेष म्हणजे, आमदार बनसोडे यांच्या नाराजीमागे शहर राष्ट्रवादीची वाटचाल 'दुसऱ्यांच्या ओंजळीने' अर्थात पक्षाबाहेरील लोकांद्वारे पक्ष चालवला जात आहे, असे मुख्य कारण आहे. पक्षात अनुभवी लोकांची मोठी फळी असताना विद्यमान पदाधिकारी विशिष्ट हेतूने काम करीत असून, त्याचा फटका पक्षाच्या दूरगामी स्वरुपात बसणार आहे, असा दावा आमदार बनसोडेंच्या निकटवर्तींकडून केला जात आहे.

### खासदार, आमदार नाराज; राष्ट्रवादी हतबल...

» दुसरीकडे, संसदेच्या अधिवेशनानिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बोलावलेल्या राज्यातील सर्वपक्षीय खासदारांच्या बैठकीवर महाविकास आघाडीने बहिष्कार टाकूनही शिरुरचे राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार डॉ. अमोल कोल्हे हे तिला उपस्थित राहिल्याने काल त्याची मोठी राजकीय चर्चा झाली. ती निवळायच्या आत याच पक्षाचे पिंपरीचे आमदार अण्णा बनसोडे यांनी, तर थेट मुख्यमंत्र्यांच्या मोटारीतूनच प्रवास केल्याने ही दुसरी चर्चा आज रंगली.हे दोन्ही खासदार, आमदार पक्षात नाराज असल्याची चर्चा खूप अगोदरपासून सुरु आहे. त्यात पक्षाच्या बैठकांना अनेकदा त्यांनी दांडी मारल्याने या चर्चेने मूळही धरले होते. पण, त्या त्या वेळी या दोघांनीही तसे काही नसल्याचे व आजारी असल्याने वा इतर कारणांमुळे गैरहजर राहिल्याचे सांगितले होते. या चर्चेचा धसका खुद्द पक्षाचे नेते अजित पवार यांनीही घेतला होता. कारण, अजित पवार पिंपरी-चिंचवडच्या दौऱ्यात असताना बनसोडे अनेकदा अनुपस्थित राहिले आहेत.

# माया बारणे, राजेंद्र जगतापांसह २० जणांची लढाईची तयारी

## » पहिल्या दिवशी 34 उमेदवारी अर्ज : राष्ट्रवादीकडून 3 आणि 12 जण अपक्ष

।पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या पहिल्या दिवशी २० जणांनी ३४ उमेदवारी अर्ज नेले आहेत. त्यामध्ये भाजप, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, एमआयएम, वंचित बहुजन आघाडी, पिंपरी-चिंचवड परिवर्तन आघाडीच्या प्रत्येक एक आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून तिघांनी तसेच अपक्ष १२ जणांनी उमेदवारी अर्ज नेले आहेत.**




चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे भाजप आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांचे ३ जानेवारी रोजी निधन झाले. त्यामुळे रिक्त जागेसाठी पोटनिवडणूक होत आहे. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज वाटप व सादर करण्यासाठी मंगळवारपासून सुरूवात झाली आहे. ७ जानेवारी ही उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख आहे.

उमेदवारी अर्ज वाटप व सादर करण्याच्या पहिल्या दिवशी २० जणांनी अर्ज नेले आहेत. भारतीय जनता पार्टीकडून बायडाबाई ऊर्फ कल्पना सुखदेव काटे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाकडून ऍड. अनिल बाळू सोनवणे, राष्ट्रवादी काँग्रेसकडून माया संतोष बारणे, संभाजी बाळासाहेब बारणे, राजेंद्र गणपत जगताप, एमआयएमकडून जावेद शेख, वंचित बहुजन आघाडीकडून रविंद्र विनायक पारदे, पिंपरी-चिंचवड परिवर्तन आघाडीकडून रावसाहेब शंकर चव्हाण आणि अपक्ष म्हणून प्रफुल्ला शैलेंद्र मोनलिंग, हरीभाऊ ऊर्फ हरिष भिकोबा मोरे, भोसले मिलिंद राजे, रफिक रशिद कुरेशी, बाळू तुळशीराम शिंदे, दादाराव किसन कांबळे, वहिला शहेनू शेख, अविनाश तुकाराम गायकवाड, अजय हनुमंत लोंढे, सुधीर लक्ष्मण जगताप, बालाजी लक्ष्मण जगताप, सालारभाई उमरसाब शेख या २० जणांनी ३४ उमेदवारी अर्ज नेले आहेत.

### निवडणूक विभागाकडून कार्यवाही...

» नामनिर्देशन पत्र नेताना नोंदवही मध्ये संबंधितांची प्राथमिक माहिती नोंदवली जात असून यामध्ये दिनांक व वेळेसह नामनिर्देशन पत्र नेणाऱ्या उमेदवाराचे नाव, पत्ता, नामनिर्देशन पत्रांची संख्या, राजकीय पक्षाचे संपूर्ण नाव, उमेदवाराचा प्रवर्ग, भ्रमणध्वनी क्रमांक, ईमेल आयडी, नामनिर्देशन पत्र ताब्यात घेणाऱ्याचे नाव, आदी बाबींची नोंद केली जाते. त्यानंतर नामनिर्देशन पत्र ताब्यात घेणाऱ्याची स्वाक्षरी घेऊन त्यास नामनिर्देशन पत्राची प्रत तसेच आचारसंहिता पुस्तिकेची प्रत दिली जात आहे. निवडणूक विभागाकडून अत्यंत अचूकपणे कार्यवाही सुरू झाली आहे.

# कसब्यासाठी मविआत रस्सीखेच!

## राष्ट्रवादीच्या डझनभर इच्छुकांची यादी आली समोर

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

भाजप आमदार मुक्ता टिळक यांच्या निधनामुळं रिक्त झालेल्या कसबा पेठ विधानसभा पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसनंतर आता राष्ट्रवादीतूनही डझनभर इच्छुक



आहेत. याची यादीच समोर आली आहे. यामुळं आता कसबा पोटनिवडणुकीसाठी महाविकास आघाडीमध्येच जोरदार रस्सीखेच सुरू झाली आहे.

काँग्रेस आणि शिवसेनेपाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेसनेही या जागेवर दावा केला आहे. शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांची यासंदर्भात पुण्यात बैठक झाली. या बैठकीत एकूण दहा इच्छुकांची नावं प्रदेशाकडं पाठवण्याचा निर्णय झाला आहे.

कसबा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसची मोठी ताकद आहे, त्याचप्रमाणे माहविकास आघाडीतील इतर पक्षामध्ये निवडणूक लढवण्याच्या दृष्टिकोनातून अपेक्षित हालचाल दिसत नाहीये. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसने ही निवडणूक लढवली पाहिजे असा आग्रह यावेळी कार्यकर्त्यांनी धरला, अशी माहिती सुत्रांकडून कळते.

### 'हे' आहेत राष्ट्रवादीचे इच्छुक उमेदवार

» कसबा पेठ विधानसभा पोट निवडणुकीसाठी राष्ट्रवादीकडून अंकुश काकडे, अण्णा थोरात, रवींद्र माळवदकर, गणेश नलावडे, वनराज आंदेकर, रुपाली पाटील, शिल्पा भोसले, दत्ता सागरे या प्रमुख नावासह एकूण 10 इच्छुकांची नावं समोर आली असून यांची नावं प्रदेश कार्यालयाकडं पाठवण्यात येणार आहेत.

# दूध दरात दोन रुपयांनी वाढ

## महाराष्ट्र राज्य दूध व्यावसायिक संघटनेचा निर्णय!

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्यातील खासगी आणि सहकारी दूध संघांची शिखर संघटना असलेल्या महाराष्ट्र राज्य दूध व्यावसायिक संघटनेने गायीच्या प्रति लिटर दूध विक्री दरात दोन रुपयांनी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. ही दरवाढ आजपासून (एक फेब्रुवारी) लागू होणार आहे.अखेर नुकतेच शासनाने महापालिकेला पत्र पाठवून ही दोन्ही गावे महापालिकेतून वगळावीत असा मुख्यसभेत ठराव करून शासनाकडे पाठवावा असे आदेश दिला आहे.संघटनेचे सचिव प्रकाश कुतवळ यांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी सायंकाळी दूरदृष्य प्रणालीद्वारे महाराष्ट्रातील प्रमुख २२ खासगी आणि सहकारी दूध संस्थांची बैठक झाली. दूध खरेदी दर, दूध पिशवी पॅकिंग आणि वाहतूक खर्चात वाढ झाली आहे. राज्यातील बाजारपेठेत परराज्यातील दूध संघांची विक्री वाढत आहे. त्यामुळे स्पर्धेत टिकण्यासाठी दूधच्या किरकोळ विक्री दरात दोन रुपयांनी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. ही दरवाढ एक फेब्रुवारीपासूनच लागू होणार आहे.



# 'एमपीएससी' विद्यार्थ्यांसाठी नंदादीप सरावले!

## » निता ढमाले यांचा पाठपुरावा : राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्यातील एमपीएससी विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांसदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना नंदादीप प्रतिष्ठानच्या अध्यक्षा निता ढमाले यांनी निवेदन दिले. त्यामुळे राज्य सरकार आता काय निर्णय घेणार? याकडे परीक्षार्थींचे लक्ष लागले आहे.

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पोलिस उपनिरिक्षक 2020 च्या पदभरती संदर्भात लोकसेवा आयोगाने 25 मे 2021 रोजी पत्रक काढून जाहीर केले की, सदर पदाची मैदानी चाचणी ही 100 पैकी 60 गुणांची अर्हताकारी असेल व या गुणांचा अंतिम निवड यादी करिता विचार केला जाणार नाही. त्यानुसार आम्ही परिक्षार्थिंनी मैदानी चाचणीचा सराव केला.पूर्व परिक्षा 4 सप्टेंबर 2021 रोजी पार पडल्या. पूर्व परिक्षेच्या निकालानंतर मुख्य परिक्षेचा अर्ज भरतेवेळी देखील आयोगाने दि.13 डिसेंबर 2021 रोजी पत्रक काढून दि. 25 मे 2021 चे पत्रक अचानक रद्दबादल ठरवले. व मैदानी चाचणी अर्हताकारी नसून, तिचे गुण अंतिम निवडयादीकरिता ग्राह्य धरले, अजे जाहीर केले. 26 नोव्हेंबर 2022 रोजी मैदानी चाचणीचे वेळापत्रक जाहीर करून, दिनांक 9 जानेवारी 2023 रोजी मैदानी चाचणी घेण्यात येईल, असे जाहीर केले होते. मात्र प्रशासकीय कारणास्तव मैदानी चाचणी पुढे ढलण्यात आले.



> खात्यांतर्गत PSI परीक्षेची जाहिरात प्रसिद्ध करणे व PSI २०२० परीक्षेची मैदानी चाचणी ही १०० पैकी ६० गुणांची अर्थकारी करावी अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नंदादीप प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आली. सदर विषया बाबत मुख्यमंत्री सकारात्मक चर्चा केली व योग्य ती कारवाई करू असे आश्वासन दिले. - निता ढमाले, अध्यक्षा, नंदादीप प्रतिष्ठान, पुणे.

सदर दोन्ही निर्णय हे अन्यायकारक आहेत. कारण आयोगाच्या आधिच्या पत्रकानुसार परीक्षार्थी मैदानी चाचणीचा सराव केवळ अर्हताकारी गुण लक्षात ठेवून करत होते. आणि केवळ एका महिन्यातच 60 गुणांची क्षमता 100 पर्यंत करणे हे नैसर्गिकरित्या शक्य नाही.

त्यामुळे आम्ही काही परीक्षार्थी न्यायालयीन मार्गाने जात आहोत, आमची याचिका माननीय मॅट व माननीय उच्च न्यायालयात होती. आता आम्ही सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करत आहेत. यासाठी न्याय मिळवून देण्यास मदत करावी, असेही या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# मूकबधिर आणि कर्णबधिरांना मिळणार हक्काचा रोजगार - सुप्रिया सुळे

।खडकवासला । महाईन्यूज । प्रतिनिधी।

यशवंतराव चव्हाण सेंटरने आता समाजातील मूकबधिर आणि कर्णबधिरांना हक्काचा रोजगार मिळवून देण्याचे ठरवले आहे. रिलायन्स रिटेल लिमिटेडच्या सहकार्याने अशा व्यक्तींना नोकऱ्या उपलब्ध करून दिल्या जाणार असून त्यासाठी इच्छुकांनी अर्ज करावेत,



असे आवाहन करण्यात आले आहे.

चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांच्या संकल्पनेतून हा निर्णय घेण्यात आला आहे. लवकरच रिलायन्स स्मार्ट बाजार आणि रिलायन्स स्मार्ट स्टोअर्स मध्ये अशा व्यक्ती नोकऱ्या करताना दिसतील, अशी माहिती खासदार सुळे यांनी दिली. त्यांच्या कल्पनेला रिलायन्स रिटेल लिमिटेडने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. यशवंतराव चव्हाण सेंटर आणि रिलायन्स स्मार्ट स्टोअरच्या संयुक्त विद्यमाने हे संपूर्ण नियोजन करण्यात येणार आहे.

पुण्यातील औंध, वाकड, हिंजवडी, पिंपरी, पिंपळे सौदागर, पिंपळे निलख, पिंपळे गुरव, गायकवाड नगर, पाषाण, फातिमा नगर, मांजरी, कल्याणी नगर, बीटी कावडे, वाघोली, खराडी, चाकण, आळंदी, मोशी, एरंडवणे, वारजे, नऱ्हे या ठिकाणच्या रिलायन्स स्टोअर्स मध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

इच्छुकांनी अर्ज केल्यानंतर योग्य उमेदवार निवडून त्यांना पुण्यातील रिलायन्स स्मार्ट बाजार, रिलायन्स स्मार्ट स्टोअर्समध्ये ट्रेनी कस्टमर सर्व्हीस असोसिएट पदी नोकरी करण्याची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्यासाठी शिक्षणाची बारावी पास ही अट ठेवण्यात आली आहे. त्याचबरोबर मुलाखती दरम्यान १२ वी पास प्रमाणपत्र, दिव्यांगत्व प्रमाणपत्र, कोरोना लसीकरण प्रमाणपत्र, PAN कार्ड, आधार कार्ड, बँकेचे खाते, पासपोर्ट फोटो या कागदपत्रांची आवश्यकता असणार आहे.

बारावी पास झालेल्या इच्छुकांनी आपली नावे यशवंतराव चव्हाण सेंटरकडे नोंदवावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. येत्या ५ फेब्रुवारी पर्यंत नाव नोंदणी करता येणार आहे. अधिक माहितीसाठी ८४५९९००८३१, ८००७१८२५१० किंवा ८६५२११८९४९ या नंबरवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# संघर्ष होगा...लढाई आरपार!

## » राष्ट्रवादीचा निर्धार : अजित पवार यांच्या वक्तव्याने कार्यकर्त्यांमध्ये 'जान'

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपा विरुद्ध राष्ट्रवादी संघर्ष अटळ आहे.आगामी महापालिका आणि विधानसभा, लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असलेली ही निवडणूक लढवण्याचा निर्णय झाला असून, राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार उमेदवारीबाबत दोन दिवसांत घोषणा करण्याची शक्यता आहे.**



चिंचवड विधानसभेची पोटनिवडणूक बिनविरोध करण्याच्या भाजपाच्या प्रयत्नांना अपयश आले आहे. कोल्हापूर, पंढरपूर, नांदेड मधील पोटनिवडणुकीचा दाखला देत चिंचवड आणि कसबा पोटनिवडणूक लढविण्यावर मी ठाम असल्याचे सांगत चिंचवडमधून निवडणूक लढविण्यासाठी माझ्याकडे आत्तापर्यंत 8 ते 9 जणांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि महाविकास आघाडी म्हणून उमेदवारी मागितली आहे. त्याबद्दल मी इच्छुकांशी समोरा-समोर बोलणार असल्याचे राष्ट्रवादीचे नेते, विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी सांगितले. त्यामुळे चिंचवडची पोटनिवडणूक होणार हे निश्चित झाले आहे.

विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी मुंबईत पत्रकारांशी संवाद साधला. अंधेरीप्रमाणे कसबा आणि चिंचवडची पोटनिवडणूक बिनविरोध करण्याची विनंती भाजपने केली आहे.

निवडणूक बिनविरोध होणार का, असे विचारले असता पवार म्हणाले, मी निवडणूक लढविण्यावर ठाम आहे. कोल्हापूर, पंढरपूर, नांदेड मध्ये पोटनिवडणूक झाली. त्यामुळे अंधेरीचे उदाहरण देणे कितपत योग्य आहे? प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. परंतु, मी त्या अँगलने (बिनविरोध) अजिबात विचार करत नाही. उद्या राष्ट्रवादीच्या आमदारांची बैठक आहे. त्यात पुणे जिल्ह्यातील आमदारांशी चर्चा केली जाईल.

**नाना काटे की मयूर कलाटे?**

शहरातील राष्ट्रवादीचे 06 नेते आणि पदाधिकारी या जागांवरुन पोटनिवडणूक लढवण्यास इच्छूक आहेत. त्यांची यादी प्रदेशाध्यक्षांकडे पाठवण्यात आली असून यामध्ये ज्येष्ठ नेते भाऊसाहेब भोईर, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, माजी नगरसेवक प्रशांत शितोळे, मयूर कलाटे, राजेंद्र जगताप, मोरेश्वर भोंडवे यांचा समावेश आहे. दरम्यान, चिंचवड विधानसभा पोटनिवडणूक लढण्यासाठी अनेकजण इच्छूक असल्याचं दर्शवत आहेत. त्यात काँग्रेस आणि शिवसेनेनंही यापूर्वीच चिंचवडच्या जागांवर हक्क सांगितला आहे. या पोटनिवडणुकींसाठी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख 7 फेब्रुवारी आहे. तर मतदान 27 फेब्रुवारी रोजी होणार आहे. तर मतमोजणी 2 मार्चला होणार आहे.

दरम्यान, राष्ट्रवादीतील नाना काटे आणि मयूर कलाटे यांच्या उमेदवारीवरुन जोरदार रस्सीखेच सुरू आहे. कोणाला संधी मिळणार हे पाहणे औत्सुक्याचे आहे.

### राष्ट्रवादीचा डाव फसला?

**» भाजपा सहानुभूतीचे 'शस्त्र' वापरुन निवडणूक बिनविरोध खिशात घालण्याच्या तयारीत आहे, ही बाब लक्षात आल्यानंतर राष्ट्रवादीतील काही स्थानिक धुरंधरांनी जगताप घराण्यात फूट पाडण्याचा प्रयत्न केला. शंकर जगताप आणि दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या पत्नी अश्विनी जगताप असे दोन गट भासवण्यात आले. त्यासाठी मोठे षडयंत्र रचण्यात आले. अश्विनी जगताप या राष्ट्रवादीच्या संपर्कात आहेत, अशी अफवा उठवून भाजपाची अस्वस्थता वाढवण्यात आली. किंबहुना, अश्विनी जगताप यांच्या संपर्क करुन "आता नाही, तर कधी नाही" असा संदेश पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला. जगताप कुटुंबातील व्यक्ती राष्ट्रवादीच्या चिन्हावर लढवायचा आणि भाजपा धक्का देण्याचा हा प्रयोग होता. पण, फसला. जगताप कुटुंबियांनी भाजपा निष्ठा कायम ठेवली. गेल्या आठ-दहा दिवसांत भाजपाचे केंद्रातील आणि राज्यातील दिग्गज नेते जगताप कुटुंबीयांच्या थेट संपर्कात आहेत. त्यामुळे अश्विनी जगताप राष्ट्रवादीच्या उमेदवार होतील, याची सूतराम शक्यता नाही. ही बाब लक्षात येण्यासाठी राष्ट्रवादीने चार-पाच दिवसांचा निर्णायक वेळ गमावला. हे राष्ट्रवादीच्या शहर आणि राज्यातील नेतृत्वाचे अपयश आहे.**

---

# राष्ट्रवादीचे मयूर कलाटे यांची 'फिल्डिंग'!

## »चिंचवड पोटनिवडणूक : अजित पवार यांच्या निर्णयाकडे लक्ष

।पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहराच्या राजकारणाला कलाटणी देणाऱ्या चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत आता माजी नगरसेवक आणि अजित पवार यांचे निकटवर्ती मयूर कलाटे यांच्या उमेदवारीबाबत राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.**



इतर पक्षातील उमेदवाराला पुरस्कृत करण्यापेक्षा 'क्लीन फेस' म्हणून कलाटे यांना उमेदवारी दिल्यास राष्ट्रवादीतून नाराजी किंवा फंदी फितुरी होणार नाही, असा सूर आहे.राष्ट्रवादीचे युवा नेते पार्थ पवार यांनी मावळमधून लोकसभा लढवली. त्यावेळी मयूर कलाटे यांनी आव्हानात्मक परिस्थितीत काम केले आहे. खासदार श्रीरंग बारणे यांच्या विरोधात थेटपणे भूमिका घेत पार्थ पवार यांचे काम मयूर कलाटे यांनी अगदी धाडसीपणे केले होते. याच दरम्यान राष्ट्रवादीची प्रचंड प्रमाणात पडझड सुरू होती. शहरातील अनेक नेते, पदाधिकारी राष्ट्रवादीमधून भाजपमध्ये जात होते. मयूर कलाटे प्रतिनिधित्व करीत असलेल्या प्रभागांमध्ये बहुतांश भाजपला मानणारे मतदार आहेत. असे असताना प्रचंड जोखीम पत्करत मयूर कलाटे यांनी राष्ट्रवादीची एकनिष्ठता कायम ठेवली.

पोट निवडणुकीसाठी माजी विरोधी पक्षनेते नाना काटे प्रचंड इच्छुक आहेत. शिवसेनेचे माजी गटनेते राहुल कलाटे हे देखील या मतदारसंघातून निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक आहेत. वेळप्रसंगी राष्ट्रवादीने आपल्याला पुरस्कृत करावे असे देखील त्यांच्याकडून सांगण्यात येत आहे. मात्र राहुल कलाटे यांना उमेदवारी दिल्यास प्रचंड नाराजी उफाळून येऊ शकते. त्यामुळे जर मयूर कलाटे यांना उमेदवारी दिली तर राष्ट्रवादीकडून कोणत्याही प्रकारचा रोष समोर येणार नाही. शिवाय मयूर कलाटे आणि राहुल कलाटे हे दोघेही बंधू आहेत. त्यांच्या घरामध्ये देखील सलोख्याचे संबंध आहेत त्यामुळे त्यांचा एकमेकांना विरोध होणार नाही. त्यामुळे पक्षाबरोबर नागरिकांमध्ये देखील कलाटे यांच्या नावाची चर्चा आहे, असे देखील बोलले जात आहे.

### पक्षनेतृत्वाशी निष्ठेची बक्षीसी मिळणार...

**» राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांच्या सोबतच राहण्याची भूमिका ठेवत राष्ट्रवादीचे काम या मतदारसंघांमध्ये नेटाने केले. त्यानंतर 2017 मध्ये झालेल्या महापालिका निवडणुकीत चिंचवड मतदार संघामध्ये भाजप बहुल असे वातावरण असताना मयूर कलाटे यांनी पक्षनिष्ठा कायम ठेवली. निवडूनही आले होते. याच कालावधीमध्ये ज्येष्ठांना विरोधी पक्षनेते पदाची संधी दिली गेली. मात्र युवा चेहरा, प्रभागात तसेच आयटीयन्समध्ये जनसंपर्क असलेला चांगला चेहरा म्हणून मयूर कलाटे हे विरोधी पक्षनेते पदाचे दावेदार असताना सुद्धा त्यांना ही संधी मिळाली नाही. तरी देखील कलाटे यांनी कोणतीही नाराजी पक्ष नेतृत्वावर दाखवली नाही. त्यानंतरही ते पक्ष नेतृत्वाशी एकनिष्ठ राहिले. याचीच बक्षीसी म्हणून कलाटे यांना उमेदवारी मिळण्याची दाट शक्यता आहे.**

## संपादकीय »

# ऑक्सफॅमी अश्रुपात

*दरवर्षी हिवाळ्यात थंडी पडली की आपल्याकडील हवेच्या गुणवत्तेचा मुद्दा चर्चेस येतो आणि दरवर्षी याच सुमारास दावोस येथे जागतिक धनवंतांचा कुंभमेळा भरला की अर्थस्थितीच्या गुणवत्तेचा 'ऑक्सफॅम'चा अहवाल हा चर्चेचा विषय बनतो.*

करोनाकाळाचा काय तो अपवाद. यंदाही दावोस येथे श्रीमंतीचे मार्ग धुंडाळण्यासाठीच्या चर्चेस सुरुवात होत असताना ऑक्सफॅमचा जागतिक अहवाल प्रसृत झाला आहे. ऑक्सफॅम ही कंपनीसारखी चालवली जाणारी जागतिक स्वयंसेवी संस्था. श्रीमंत म्हणावी अशी. तिला अनेकांचा पाठिंबा असतो आणि या संस्थेचे जाळेही सर्वदूर विणले गेले आहे. गेल्या काही वर्षांत धनिकांच्या वर्गणी आदींवर श्रीमंती साजरी करणाऱ्या सार्वजनिक संस्थांनी श्रीमंतांविरोधात रान उठवण्याचा प्रघात पडलेला आहे. जगातील गरिबांना कसे लुबाडणे सुरू आहे आणि त्यांना कोणी कसा वाली नाही, हा अशा संस्थांतील एक समान सूर. सध्याच्या प्रचलित पद्धतीप्रमाणे समाजात नायक विरुद्ध खलनायक असे चित्र निर्माण केल्याखेरीज कोणालाही आपला कार्यक्रम रेटता येत नाही. ऑक्सफॅम अशांतील एक यशस्वी संस्था म्हणता येईल. गरीब विरुद्ध श्रीमंत असे सुष्ट विरुद्ध दुष्ट छापाचे चित्र या संस्थेकडून उत्तम प्रकारे रंगवले जाते. जनआकर्षणासाठी हे असे केल्याखेरीज पर्याय नाही हे खरे असले तरी त्यामुळे काही महत्त्वाच्या मुद्द्यांकडे लक्ष वेधले जाते हेदेखील अमान्य करता येणार नाही. ऑक्सफॅम लावीत असलेला सूर अमान्य होऊ शकेल. तथापि त्या संस्थेच्या अहवालातून प्रसृत होणारी माहिती अदखलपात्र असते असे म्हणता येणार नाही. म्हणून या ताज्या अहवालाकडे लक्ष वेधणे आवश्यक. परिवर्तनाची आस असल्याने लोक उत्स्फूर्तपणे राहुल गांधींना भेटत होते. बेरोजगारांमध्ये निराशा आहे.हा अहवाल करोनोत्तर धननिर्मितीवर लक्ष केंद्रित करतो. या संघटनेच्या म्हणण्यानुसार गेल्या वर्षभरात जगात निर्माण झालेल्या संपत्तीतील २६ लाख कोटी डॉलर्स हे श्रीमंत वर्गाच्या खिशात गेले. म्हणजे जगभरात निर्माण झालेल्या संपत्तीपैकी ६३ टक्के या धनाढ्यांकडे गेले आणि उर्वरित ३७ टक्के मत्ता ९९ टक्के जनतेस वाटून घ्यावी लागली. गेल्या साधारण २५ वर्षांत अशी स्थिती निर्माण झाली नव्हती, असा या संघटनेचा दावा. अशी म्हणजे गरिबी आणि श्रीमंती या दोन्हींतही दमदार वाढ होण्याची स्थिती. यावर या संघटनेचा तोडगाही वर्षानुवर्षे तसाच राहिलेला आहे. धनाढ्यांवर अधिकाधिक कर लावा आणि गरिबांस सवलती द्या. ही संघटना म्हणते की श्रीमंतांच्या तिजोरीत जाणाऱ्या प्रत्येक एक डॉलरातील जेमतेम चार सेंट्स करापोटी सरकारला मिळतात आणि अध्र्याहून अधिक धनाढ्य तर अशा देशांत राहतात की जेथे कमीत कमी भरावे लागतात.

# कर्जात बुडू नका, पोहायला शिका!




**आपल्याला असलेली नियमित आर्थिक आवक, उत्पन्नाचे साधन, होणारा खर्च तसेच आपली आर्थिक परिस्थिती आणि कोणत्याही अचानक उद्भवलेल्या आर्थिक संकटावर मात करण्यासाठी आपण केलेली बचत अथवा तजवीज याचा ताळमेळ सगळ्यांनाच जमतोय असं नाही. दिवसेंदिवस वाढत चाललेली महागाई, पैसा मिळवण्यासाठी वापरले जाणारे शॉर्टकट, लवकरात लवकर श्रीमंत होण्यासाठी केलेले उलटेपालटे व्यवहार यांसारख्या सवयी आपल्या जीवावर उठत आहेत. शेती तसेच उद्योगधंद्यांसाठी कर्ज घ्यावे लागते. त्याचा सुयोग्य उपयोग करावा. त्यात बुडून आत्महत्येचा मार्ग स्वीकारणे योग्य नाही.**

आजपर्यंत आपण सातत्याने पाहत आलो की आपला बळीराजा शेतकरी सतत कर्जात डुबलेला असल्यामुळे शासनाचे कोणतेही निश्चित ध्येयधोरण, उपाययोजना नसल्याने





मृत्यूला कवटाळत आहे. जी काही ध्येयधोरणे, तजवीज या आत्महत्या थांबविण्यासाठी केली जात असते ती वेळेत आणि अपेक्षित प्रमाणात न मिळाल्यामुळे नैराश्य, कौटुंबिक जबाबदाऱ्या, गहाण पडलेल्या शेतजमिनी, सावकारांचा तगादा, कोठूनही घेतलेल्या कर्जाचे थकलेले हप्ते यामुळे हतबल होऊन अनेक शेतकऱ्यांना आपला जीव गमवावा लागला आहे. आजपर्यंत आपण आपल्या कृषिप्रधान देशात शेतकरी आत्महत्या थांबवण्यात पूर्णपणे यशस्वी झालेलो नाही हे आपलं दुर्दैव आहे. त्यातूनच आजमितीला सुशिक्षित चांगल्या कुटुंबातील, शिकले सवरलेले लोकदेखील केवळ डोईजड झालेल्या कर्जामुळे, खासगी सावकारांकडून भरमसाठ व्याजाने पैसे घेऊन ते वेळेत न फेडू शकल्यामुळे, उधार उसणवारीचे प्रमाण फेडण्याच्या पलीकडे गेल्यामुळे आत्महत्या करीत आहेत. वाढत्या आत्महत्यांमागील बहुतांश कारणे जर पाहिलीत तर त्यात आर्थिक ओढाताण, कर्ज, उद्योगधंद्यात आलेले अपयश, आर्थिक नुकसान, तोटा, कर्ज वसुलीसाठी वापरली गेलेली अमानुष अपमानास्पद वागणूक, अर्वाच्य भाषा, शिवीगाळ यांसारखी कारणे मोठ्या प्रमाणात दिसून येतात.

आपल्याला असलेली नियमित आर्थिक आवक, उत्पन्नाचे साधन, होणारा खर्च तसेच आपली आर्थिक परिस्थिती आणि कोणत्याही अचानक उद्भवलेल्या आर्थिक संकटावर मात करण्यासाठी आपण केलेली बचत अथवा तजवीज याचा ताळमेळ सगळ्यांनाच जमतोय असं नाही. दिवसेंदिवस वाढत चाललेली महागाई, पैसा मिळवण्यासाठी वापरले जाणारे शॉर्टकट, लवकरात लवकर श्रीमंत होण्यासाठी केलेले उलटेपालटे व्यवहार यांसारख्या सवयी आपल्या जीवावर उठत आहेत.अनेक सर्वसामान्य कुटुंब नवीन घर, घराचं नूतनीकरण, नवी गाडी, छोट्या मोठ्या घरगुती वस्तू, फर्निचर, मुलांचं शिक्षण, लग्न यासाठी कर्ज घेतात. आपण प्रगती करावी, लवकरात लवकर सेटल व्हावे, आपल्या हक्काचं स्वमालकीचं सर्वकाही आपल्याकडे असावं, आपल्याला उच्च राहणीमान उपभोगता यावं, समाजात आपल्याला मिरवता यावं या अपेक्षा, ही स्वप्न पाहत असताना त्यासाठी भरपूर प्रयत्न, प्रामाणिक कष्ट सर्वसामान्य माणूस सातत्याने करीत असतो. हे करणं गैर नाही. आपण महत्त्वाकांक्षी नक्कीच असावं, पण त्यासाठी चुकीचे निर्णय, चुकीच्या लोकांकडून घेतलेली आर्थिक मदत आपल्या अंगलट येऊ शकते याचेही भान जपणे आवश्यक आहे.सध्या पती-पत्नी दोघेही कमावते असल्यामुळे कर्जाचे हफ्तेदेखील व्यवस्थित फेडले जातात. अतिशय तरुण वयात स्वतःचं सुसज्ज घर, गाडी घेऊन झपाट्याने ते भविष्याचे नियोजन करायला लागतात, पण काहींच्या बाबतीत हे शक्य होत नाही आणि आयुष्याची घडी विस्कटून जाते. सगळ्यांनाच सर्वकाही जमेल, सगळेच आर्थिक गणित आपल्या नियोजनानुसार जुळेल याबद्दल काहीच शाश्वती नसते. आपल्याला नोकरी अथवा व्यवसायामार्फत निश्चित स्वरूपात पगार अथवा इन्कम असेल तर आपण कोणत्याही अधिकृत, कायदेशीर मार्गाने कर्ज घेऊ शकतो. ते परत फेडू शकतो. जर कोणत्याही अधिकृत ठिकाणांवरून कर्ज नाकारलं गेलं, आपण त्याच्या नियमात बसत नसलो तर आपण खासगी सावकार, व्याजाने पैसे घेणे, सोने तारण ठेवणे, अथवा इतर कोणतीही मौल्यवान वस्तू तारण ठेवून वाटेल त्या व्याजदराने पैसे उचलतो. भविष्यात काहीतरी तजवीज होईल, उत्पन्न मिळेल, कोणी नातेवाईक, मित्र मदत करेल या भाबड्या आशेवर आपण मोठी जोखीम स्वीकारतो. अशा अनधिकृत पद्धतीने घेतलेल्या पैशांच्या व्याजाचा मीटर सुरू झाल्यावर प्रचंड त्रासदायक ठरतो. व्याजाने पैसे घेऊन त्याचे व्याज वेळेत न भरल्यास लावला जाणारा तगादा आपली मानसिक स्थिती उद्विग्न करून टाकतो.

# जागतिक विषमतेवर लवकर उत्तरे शोधावी लागतील

**विश्व विषमता अहवाल २०२२ (वर्ल्ड इनइक्वॅलिटी रिपोर्ट २०२२) अनुसार- "१९८० पासूनच जगात सर्वत्र उत्पन्न आणि संपत्ती यांच्याबाबतीत विषमता वाढत असल्याचे दिसून येते."**

या अहवालाप्रमाणे २०२१ मध्ये जगातील सर्वोच्च १०% श्रीमंतांच्या वाट्याला एकूण जागतिक उत्पन्नापैकी ५२ टक्के एवढे उत्पन्न येत होते. संपत्तीच्या बाबतीत हेच प्रमाण ७६ टक्के एवढे लक्षणीय आहे. त्यापैकी सर्वोच्च एक टक्का श्रीमंतांकडे एकूण उत्पन्नाच्या १९ टक्के आणि एकूण संपत्तीच्या ३८ टक्के एवढा वाटा आहे. या तुलनेत तळातील ५० टक्के गरिबांची उत्पन्नातील आणि संपत्तीमधील भागीदारी वर्तमान आर्थिक विषमतेची तीव्रतेने जाणीव करून देते. जगातील उत्पन्नाच्या फक्त ८.५ टक्के उत्पन्न तळातील ५०% गरिबांच्या वाट्याला येते. तसेच त्यांच्याकडील संपत्तीचा वाटा तर नगण्य म्हणजे केवळ २ टक्के आहे. भारताची स्थितीही याबाबतीत चिंताजनक आहे. भारतात २०२१ या वर्षी सर्वोच्च १० टक्के आणि १ टक्के श्रीमंतांच्या वाट्याला एकूण उत्पन्नाच्या ५७ टक्के आणि २२ टक्के एवढे उत्पन्न येते. तळातील ५० टक्के गरिबांच्या वाट्याला मात्र एकूण



उत्पन्नाच्या केवळ १३.१ टक्के एवढे उत्पन्न येत होते. संपत्तीच्या बाबतीत तर परिस्थिती अधिक निराशाजनक आहे. सर्वोच्च १० टक्के आणि १ टक्के श्रीमंतांच्या वाट्याला एकूण संपत्तीच्या अनुक्रमे ६५ टक्के आणि ३३ टक्के एवढी संपत्ती येते. तळातील ५० टक्के गरिबांच्या वाट्याला मात्र एकूण संपत्तीच्या केवळ ६ टक्के एवढी संपत्ती येते.

उपरोल्लेखित विश्व विषमता अहवाल २०२२ हा जगातील विद्यमान आर्थिक विषमतेचे कारण मुक्त आर्थिक धोरण आणि उदारीकरण असल्याचे स्पष्टपणे उल्लेख करतो. कारण अशा धोरणांचा अवलंब सर्व जगात साधारणपणे १९८० पासून केला जात आहे. आणि तेव्हापासूनच आर्थिक विषमतेत पूर्वीपेक्षाही अधिक वाढ होत असल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. परंतु मुक्त आर्थिक धोरणांचा अवलंब करणे हा जगाने स्वीकृत केलेल्या मूल्यव्यवस्थेचा अपरिहार्य परिणाम होता, हेही लक्षात घेण्याची गरज आहे. व्यक्तिस्वातंत्र्य या मूल्याची वाढलेली प्रतिष्ठा हे आधुनिक काळाचे वैशिष्ट्य आहे. या मूल्यानुसार प्रत्येकाला स्वतःचे निर्णय घेण्यासाठी मुक्त स्वातंत्र्य हवे आहे. आधुनिक मानवाच्या या प्रवृत्तीला आणि इच्छेला अनुसरून सामाजिक संस्थांची आणि व्यवस्थांची निर्मिती होत असते. माणसाचे आर्थिक जीवनही याला अपवाद असू शकत नाही. म्हणूनच आर्थिक विश्वात सर्वत्र मुक्त अर्थव्यवस्थेचा बोलबाला सुरू झाला.

मुक्त अर्थव्यवस्थेच्या प्रारंभीच्या काळात तिचे संभाव्य दुष्परिणाम लक्षात घेतले गेले नाहीत. उलट 'ट्रिकल डाऊन थियरी'च्या पुरस्कर्त्यांनी अधिक श्रीमंत व्यक्ती आणि कंपन्या यांच्यासाठी करकपातीच्या योजना आणि नियंत्रणे सैल करण्याचे धोरण यांना प्रोत्साहन दिले.

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।
या मज सोडवा लवकरी ॥१॥
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥
**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राज्यातील शिक्षकेतर कर्मचारी आंदोलनाच्या पवित्र्यात!

## 20 फेब्रुवारीपासून बेमुदत काम बंद आंदोलनाचा इशारा

।मुलुंड। महाईन्यूज ।

**महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय आणि महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समितीतर्फे अकृषी विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांची पूर्तता न झाल्याने आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.**

मागील चार वर्षांपासून अनेक मागण्या शासनस्तरावर प्रलंबित असल्याने शिक्षकेतर कर्मचारी आंदोलन करण्याच्या मार्गावर आहेत. या संदर्भात चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय आणि महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समितीचे प्रमुख सल्लागार डॉ. आर. बी. सिंग यांच्या नेतृत्वाखाली नुकतीच (ता. २१) सभा पार पडली. या सभेत २० फेब्रुवारीपासून बेमुदत काम बंद आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.



१८ डिसेंबर २०२१ पासून ११ दिवस प्रलंबित मागण्यांबाबत राज्यातील अकृषी विद्यापीठे आणि महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी राज्यस्तरीय काम बंद आंदोलन केले होते; मात्र तत्कालीन तंत्रशिक्षण मंत्री यांच्या आश्वासनानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले होते; परंतु चर्चा आणि आश्वासन याव्यतिरिक्त कर्मचाऱ्यांच्या पदरी काही पडले नाही. प्रमुख मागण्यांसंदर्भात समितीने सरकारदरबारी पुन्हा आपला आवाज उठवला आहे.

आपल्या आंदोलनाची दिशा, आपल्या मागण्या इत्यादी सविस्तरपणे निवेदनात मांडले आहे. सदर मागण्या मान्य न झाल्यास संपूर्ण राज्यातील अकृषी विद्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी २० फेब्रुवारीपासून बेमुदत काम बंद आंदोलन करणार असल्याचा इशारा

### या आहेत मागण्या

- सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा रद्द केलेला शासन निर्णय पुनर्जीवित करणे.
- १ जानेवारी २०१६ ते ३१ ऑक्टोबर २०२० दरम्यानची सातवा वेतन आयोग फरकाची थकबाकी व १४१० विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन आयोग लागू करणे.
- विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर १ लाख कर्मचाऱ्यांची रिक्त असलेली पदे भरण्यास मान्यता देणे.
- २००५ नंतर रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेंशन योजना लागू करणे.
- विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाची वेतन श्रेणी गृहीत धरून त्याआधारे सातवा वेतन आयोगाची वेतनश्रेणी लागू करणे.

# "किरीट सोमय्या हा दलाल..."

## म्हाडा कार्यालयाबाहेर ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांची टीका

। भिवंडी । महाईन्यूज ।

**किरीट सोमय्या यांनी दबाव आणला आणि पाडकाम झालं. त्यानंतर किरीट सोमय्या हे वांद्रे या ठिकाणी जाणार होते.**

मात्र तुम्ही जाऊ नका असं सांगत त्यांना पोलिसांनी अडवलं. त्यानंतर ते म्हाडा कार्यालयात गेले. म्हाडा कार्यालयामध्ये त्यांनी अनिल परब यांच्यावर टीका केली. अनिल परब यांना खंडणी, वसुली करताना मराठी माणूस आठवला नाही का? असा प्रश्न त्यांनी विचारला. त्यानंतर त्यांनी वांद्रे या ठिकाणी जाणं टाळलं मात्र तिथलं अनधिकृत बांधकाम पाडल्याचे फोटो ट्विट केले. यानंतर मोठ्या संख्येने ठाकरे गटाचे शिवसैनिक म्हाडा कार्यालयाच्या बाहेर जमले आहेत. त्यांनी जोरदार घोषणाबाजीही केली. तसंच अनिल परब हे म्हाडा कार्यालयात गेले आहेत. समाधानकारक उत्तर मिळेपर्यंत आम्ही इथून हलणार नाही असाही निर्धार ठाकरे गटाच्या शिवसैनिकांनी केला आहे.



### अनिल परब यांची कार रोखली

म्हाडा कार्यालयामध्ये मोठ्या गर्दीसह गेल्यानंतर आमदार अनिल परब यांची कार रोखण्यात आली. ज्यानंतर त्यांच्यासोबत आलेले ठाकरे गटाचे कार्यकर्ते आक्रमक झाले आणि घोषणा देऊ लागले. या सगळ्यांशी संवाद साधून अनिल परब त्यांच्या निवडक सहकाऱ्यांसह अधिकाऱ्यांशी बोलायला गेले आहेत.

### काय म्हणाले आहेत ठाकरे गटाचे शिवसैनिक?

किरीट सोमय्यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. ठाकरे गटाचे पदाधिकारी आक्रमक झालेले पाहण्यास मिळाले. माध्यमांकडे ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी उत्तर दिलं. आमची मागणी ही आहे की म्हाडाची जी लेआऊट आहेत ती आजची नाहीत. मग तुम्ही आजच हे का करत आहात? लोकांना न्याय दिला गेला पाहिजे. किरीट सोमय्यांसारखे दलाल मोदी सरकारने नेमले आहेत. आजपर्यंत इडीच्या कारवाया इतक्या लोकांवर झाल्या होत्या पण भाजपासोबत गेल्यावर कारवाई का केली नाही? भाजपात गेल्यावर ते सगळे पवित्र होतात का? असा प्रश्न इथे जमलेल्या कार्यकर्त्यांनी विचारला. अनिल परब हे तळागाळातले नेते आहेत. उद्धव ठाकरेंचे विश्वासू आहेत त्यामुळेच त्यांना त्रास दिला जातो आहे.

पाडकाम किरीट सोमय्यांमुळेच झालं आहे. त्यामुळे आम्ही याबाबत जाब विचारणारच असंही ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी म्हटलं आहे. किरीट सोमय्या नारायण राणेंच्या विरोधात बोलत होते ते आज का बोलत नाहीत? अनिल परब यांना फोडण्यासाठी हा दबाव निर्माण करायचा आहे असाही आरोप या कार्यकर्त्यांनी केला आहे.

# हजारो MPSC विद्यार्थ्यांना दिलासा

## शिंदे सरकारने घेतला मोठा निर्णय

। डोंबिवली । महाईन्यूज ।

मंत्रिमंडळ बैठकीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आंदोलनाची माहिती दिली. त्यानंतर इतरही मंत्र्यांनी यासंदर्भात मुख्यमंत्र्यांना अवगत केले आणि हे नियम 2025 पासून लागू करण्याची विनंती केली. त्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. यासंदर्भात लवकरच अधिकृत घोषणा होणार आहे.

एमपीएससी परीक्षा पध्दतीत आयोगाकडून करण्यात आलेले बदल हे २०२३ एवजी २०२५ पासून लागू करावेत या मागणीसाठी विद्यार्थी आंदोलन केलं होत. पुण्यातील अल्का टॉकिज चौकात MPSC परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे अराजकीय 'साष्टांग दंडवत' आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनादरम्यान, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विद्यार्थ्यांची फोनवरुन संवाद साधला.

यावेळी त्यांनी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन निर्णय कळवण्यात येईल आश्वासन दिले. त्यानंतर काही तासातच शिंदे - फडणवीस सरकारने या विद्यर्थ्यांना मोठा दिलासा दिला.



# आसारामला जन्मठेपेची शिक्षा!

## लैंगिक अत्याचार प्रकरणी आसारामला झटका, गांधीनगर सत्र न्यायालयाचा मोठा निर्णय

।गांधीनगर । महाईन्यूज ।

**एका महिला अनुयायीवर बलात्कार केल्याप्रकरणी गुजरातच्या गांधीनगर न्यायालयाने सोमवारी (३० जानेवारी) आसाराम बापूला दोषी ठरवलं होतं न्यायालयाने याप्रकरणी आसाराम बापूला जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. विशेष म्हणजे आसाराम बापुला यापूर्वीदेखील एका प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे.**

स्वयंघोषित धर्मगुरू आसाराम बापू याला गांधीनगर कोर्टाने मोठा दणका दिला आहे. आसाराम बापू हा 2013 मधील एका बलात्काराच्या प्रकरणात दोषी आढळला आहे.



आसाराम बापूला सत्र न्यायाधीश डीके सोनी मंगळवारी (31 जानेवारी) शिक्षा सुनावणार आहेत. आसारामच्या पत्नीसह अन्य सहा आरोपींची पुराव्याअभावी न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. देशात कधीकाळी आसाराम बापू हा मोठा अध्यात्मिक गुरू होता.

अहमदाबादच्या चांदखेडा पोलिस स्टेशनमध्ये दाखल करण्यात आलेल्या एफआयआरनुसार, आसारामने 2001 ते 2006 दरम्यान पीडित महिलेवर अनेक वेळा बलात्कार केला, जेव्हा ती अहमदाबादच्या बाहेरील मोटेरा येथील त्याच्या आश्रमात राहत होती.

सरकारी वकील आर सी कोडेकर यांनी सोमवारी सांगितले की, "न्यायालयाने फिर्यादीचा खटला स्वीकारला असून आसारामवर कलम 376 (2) (सी), 377 (अनैसर्गिक लैंगिक संबंध) आणि भारतीय दंड संहितेच्या बेकायदेशीर ओलीत ठवणे, अशा कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात आले आहे." ऑक्टोबर 2013 मध्ये, सुरतमधील एका महिलेने आसाराम आणि इतर 7 जणांविरुद्ध बलात्कार आणि बेकायदेशीर कैदेत ठेवल्याचा गुन्हा दाखल केला होता. खटला सुरू असताना एका आरोपीचा मृत्यू झाला. जुलै 2014 मध्ये या प्रकरणी आरोपपत्र दाखल करण्यात आले होते.

### आता जन्मठेप मिळाली ते प्रकरण नेमकं काय?

२०१३ मध्ये सुरतमधील दोन बहिणींनी आसाराम बापू आणि नारायण साई यांच्याविरोधात बलात्काराची तक्रार दाखल केली होती. २००२ ते २००५ दरम्यान नारायण साईने वारंवार तिच्यावर बलात्कार केल्याचे लहान बहिणीने तक्रारीत सांगितलं होतं. सुरतमधील आसारामच्या आश्रमात राहात असताना तिच्यावर बलात्कार झाला, असं पीडित मुलीने सांगितलं होतं.

दुसरीकडे, मोठ्या बहिणीने तक्रारीत आसारामवर बलात्काराचा आरोप केला होता. अहमदाबाद येथील आश्रमात आसारामने तिच्यावर अनेकवेळा बलात्कार केल्याचं पीडितेने सांगितले. दोन्ही बहिणींनी पिता-पुत्राच्या विरोधात स्वतंत्र तक्रारी केल्या होत्या. दरम्यान, आसाराम बापू सध्या जोधपूरच्या तुरुंगात असून त्याला २०१८ मध्ये, जोधपूर न्यायालयाने त्याला एका वेगळ्या लैंगिक अत्याचार प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती.

### गुन्हेगारी कट रचणे, पुरावे नष्ट करणे आदी आरोप

**आसाराम याच्यावर बलात्कार, अनैसर्गिक लैंगिक संबंध, गुन्हेगारी कट रचणे, पुरावे नष्ट करणे आदी आरोप आहेत. आसारामची पत्नी आणि मुलीसह अन्य सहा सहआरोपींवर प्रवृत्त करणे, ओलीस ठेवणे आणि कट रचण्याचे आरोप होते, त्यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. दोन बहिणींनी नोंदवलेल्या तक्रारीच्या आधारे सुरत पोलिसांनी 6 ऑक्टोबर 2021 रोजी एफआयआर नोंदवला होता. एक गुन्हा आसारामवर तर दुसरा त्यांचा मुलगा नारायण साई याच्याविरुद्ध दाखल करण्यात आला होता. दोघांवर बलात्कार, लैंगिक छळ, बेकायदेशीर ओलीस ठेवण्यासह अनेक कलमे लावण्यात आली आहेत.**

# १२ विमानतळांचे खासगीकरण करण्याचा केंद्र सरकारचा विचार

## याआधी 7 विमानतळांचा ताबा अदाणी समूहाकडे

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरु होत आहे. उद्या १ फेब्रुवारी रोजी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमन अर्थसंकल्प सादर करतील. तत्पूर्वी राष्ट्रीय मालमत्ता मुद्रीकरण योजनेतंर्गत आणखी उत्पन्न वाढविण्यासाठी काही नवीन योजना सादर करण्याची शक्यता आहे. टाइम्स नाऊ या वेबसाईटने दिलेल्या माहितीनुसार या अर्थसंकल्पात देशातील १२ विमानतळांचे खासगीकरण करण्याचा प्रस्ताव सादर केला जाऊ शकतो.

विमान वाहतूक मंत्रालयाने मालमत्ता विक्रीतून २० हजार कोटी रुपये उभारण्याचे ठरविले आहे. यासोबतच पुढील चार ते पाच वर्षांसाठी विमान वाहतूक सेवेतील पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी आणि वाढविण्यासाठी ९८०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. या गुंतवणुकीचा सर्वात मोठा वाटा खासगीकरणाच्या माध्यमातून मिळणार आहे. त्यामुळेच आगामी अर्थसंकल्पात विमानतळ खासगीकरणाचा प्रस्ताव मांडला जाऊ शकतो, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे.



### अदाणी समूहाकडे विमानतळांचा ताबा

**केंद्र सरकारने यापूर्वी २०१९ मध्ये अहमदाबाद, जयपूर, लखनऊ, तिरुवनंतपुरम, मंगळुरू आणि गुवाहाटी या सहा विमानतळांचा कारभार पीपीपी तत्त्वावर अदाणी समूहाकडे सोपवला होता. तर जुलै २०२१ मध्ये मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज विमानतळाचा ताबाही अदाणी समूहाकडे गेला होता. ही सर्व विमानतळे पुढील ५० वर्षे अदाणी समूहाच्या ताब्यात असणार आहेत. या काळात या विमानतळांचा विकास, प्रशासकीय कामकाज आणि देखभाल अदाणी समूहाकडून करण्यात येईल.**

### या विमानतळांचे होणार खासगीकरण

खासगीकरण करण्यात येणाऱ्या ११ ते १२ विमानतळांची यादी तयार करण्यात आली आहे. रायपूर, जबलपूर, विजयवाडा, कोलकाता, इंदूर अशा काही विमानतळांचा यामध्ये समावेश आहे.

केंद्रीय अर्थसंकल्पात खासगीकरणाची घोषणा झाल्यानंतर तसा प्रस्ताव कॅबिनेटकडे पाठविला जाईल, कॅबिनेटची मंजुरी मिळाल्यानंतर खासगीकरणाचा मार्ग मोकळा होईल. खासगीकरणाद्वारे आठ हजार कोटींपेक्षा जास्तीचे उत्पन्न निर्माण करण्याचा प्रयत्न विमान वाहतूक मंत्रालयाचा आहे.

# गेल्या दोन दशकांच्या तुलनेत २०२२ मध्ये सर्वाधिक आरोपींना फाशीची शिक्षा

## ‘डेथ पेनाल्टी इन इंडिया, ॲन्यूअल स्टॅटिस्टिक्स रिपोर्ट, 2022’: तब्बल 165 जणांना मृत्यूदंड!

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वर्ष २०२२ मध्ये देशातील सत्र न्यायालयांनी १६५ आरोपींना वेगवेगळ्या खटल्यांत मृत्यूदंड सुनावला आहे. मागील दोन दशकांमध्ये दिल्या गेलेल्या मृत्यूदंडाच्या शिक्षेच्या तुलनेत हा आकडा सर्वाधिक आहे.**

नॅशनल लॉ विद्यापीठाच्या प्रोजेक्ट ३९ ए अंतर्गत ‘डेथ पेनाल्टी इन इंडिया, ॲन्यूअल स्टॅटिस्टिक्स रिपोर्ट २०२२’ नावाचा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला आहे. या अहवालात वरील माहिती दिलेली आहे.

या अहवालानुसार न्यायपालिकेने २०२२ या साली १६५ आरोपींना मृत्यूदंडाची शिक्षा सुनावलेली आहे.

मागील दोन दशकांच्या तुलनेत हा आकडा सर्वाधिक आहे. २०२१ साली सत्र न्यायालयांनी १४६ आरोपींना मृत्यूदंडाची शिक्षा सुनावलेली आहे.

२०२२ साली मृत्यूदंडाची शिक्षा सुनावलेल्या १६५ आरोपींपैकी तीन जणांतील एकावर लैंगिक अत्याचाराचाराच्या आरोपाशी संबंधित आरोप आहेत.



### तब्बल 38 जणांना मृत्यूदंडाची शिक्षा

**मागील वर्षी अहमदाबाद येथील सत्र न्यायालयाने बॉम्ब स्फोटाच्या एका खटल्यात तब्बल ३८ जणांना मृत्यूदंडाची शिक्षा सुनावली होती. याच कारणामुळे २०२२ सालातील मृत्यूदंडाची शिक्षा मिळालेल्या आरोपींमध्ये लक्षणीय वाढ झाली होती. याआधी २०१६ साली एकाच खटल्यात एवढ्या साऱ्या आरोपींना मृत्यूदंडाची शिक्षा सुनावलेली होती.**

# शाहरुखच्या चित्रपटात प्रियांका चहर चौधरी! डंकीमध्ये दिसणार?



सुपरस्टार सलमान खानच्या प्रसिद्ध टीव्ही शो बिग बॉसनंतर स्पर्धकांचे नशीब चमकताना दिसते आहे. याचे थेट उदाहरण बिग बॉस 13 ची स्पर्धक असलेली अभिनेत्री शहनाज गिलचे नाव घेता येईल. अशा परिस्थितीत बिग बॉस सीझन 16 ची स्पर्धक प्रियांका चहर चौधरी बद्दल मोठी बातमी समोर येत आहे. ज्यामध्ये असे सांगितले जात आहे की प्रियांका चाहर चौधरी या वर्षी सुपरस्टार शाहरुख खानच्या आगामी 'डंकी' चित्रपटात एंट्री करू शकते.

बॉलीवूड लाईफच्या बातमीत सांगण्यात आले आहे की, बिग बॉस 16 ची स्पर्धक प्रियांका चहर चौधरी शाहरुख खानच्या आगामी 'डंकी' चित्रपटात महत्त्वाची भूमिका साकारताना दिसणार आहे.

'डंकी' चित्रपटाचे दिग्दर्शक राजकुमार हिरानी या चित्रपटासाठी पंजाबी मुलीच्या शोधात असल्याचे या अहवालात सांगण्यात आले आहे. याआधी सलमान खानने बिग बॉस 16 शोमध्ये सांगितले होते की, त्याच्याकडे प्रियांकासाठी खूप काही आहे.

अशा परिस्थितीत आता सलमानच्या सूचनेवरून प्रियंका चहर चौधरीला शाहरुख खानच्या 'डंकी' चित्रपटात महत्त्वाची भूमिका मिळू शकते, अशी शक्यता वर्तवली जात आहे. अशा परिस्थितीत प्रियांका चाहर चौधरी 'डंकी' चित्रपटात दिसण्याची शक्यता असल्याची चर्चा सोशल मीडियावर जोर धरू लागली आहे.



# देशाच्या पहिल्या ट्रांसजेंडर ब्युटी क्वीनची कथा!

प्रत्येक आई आपल्या मुलावर खूप प्रेम करते. भारताच्या अशाच एका आईने आपल्या मुलाची खूप काळजी घेतली, त्याला सांभाळलं, त्याचा प्रत्येक हट्ट पुरवला पण जेव्हा तो मुलगा एक ट्रांसजेंडर असं कळलं तेव्हा त्याला घराबाहेर हाकलून दिलं.तेव्हा तो मुलगा अवघ्या १० वर्षांचा होता. या मुलामध्ये काळानुरूप बदल घडू लागले, ही कहाणी आहे देशातल्या पहिल्या ट्रान्सजेंडर इंटरनॅशनल ब्युटी क्वीन जिंकणाऱ्या नाज जोशीची. जीने भारताचे नाव जगभर गाजवले.

नाज जोशीने आतापर्यंत 8 सौंदर्य स्पर्धा जिंकल्या आहेत. त्यापैकी 7 आंतरराष्ट्रीय सौंदर्य स्पर्धा आहेत. जगभरात भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या नाझचा हा प्रवास सोपा नव्हता. दिल्लीतील एका संपन्न कुटुंबात जन्मलेल्या नाझच्या कुटुंबीयांनी त्यांचा मुलगा ट्रान्सजेंडर असल्याचे कळल्यावर त्याचा तिरस्कार करायला सुरुवात केली.

# प्रेमाबद्दल केला होता मोठा खुलासा



मराठीतील आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक म्हणजे सायली संजीव. आज ती तिचा ३० वा वाढदिवस साजरा करत आहे. चित्रपट, मालिका या दोन्ही माध्यमात काम करून आपल्या अभिनयचा वेगळा ठसा उमटवणाऱ्या सायली संजीवचा प्रचंड मोठा चाहतावर्ग आहे. सायलीच्या कामबरोबरच तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल जाणून घेण्यासाठी तिचे चाहते उत्सुक असतात. तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल नेहमीच चर्चा रंगलेल्या दिसतात. अशातच एका मुलाखतीत तिने तिच्या कॉलेजच्या दिवसांमधील प्रेमाचा खुलासा केला होता. काही महिन्यांपूर्वी सायलीने सुबोध भावेच्या 'बस बाई बस' या कार्यक्रमात हजेरी लावली होती. यावेळी तिने भरभरून गप्पा मारल्या. तिने तिच्या आयुष्याबद्दल कोणालाही माहीत नसलेल्या अनेक गोष्टी शेअर केल्या. या संवादादारम्यान एका प्रश्नाचं उत्तर देताना तिने तिच्या कॉलेजच्या दिवसांमधील प्रेमाबद्दल सांगितलं होतं.ती म्हणाली होती, "मी बऱ्यापैकी स्पष्टवक्ती आहे. माझ्या जे मनात असेल ते मी बोलून मोकळी होते आणि आपल्याला जर एखादा मुलगा आवडत असेल तर आपण त्याला प्रपोज करावं. पण कॉलेजमध्ये असताना मी ज्या मुलांना प्रपोज केलं, त्यापैकी एकाही मुलाने मला होकार दिला नाही." सायलीच्या या उत्तराने तिथे उपस्थित असलेल्या सर्वांनाच फार आश्चर्य वाटलं होतं. पुढे सायली म्हणाली होती की, "आज हा एपिसोड ते बघत असतील. त्यांना हा प्रसंग बरोबर आठवेल." तिने सांगितलेला हा किस्सा चांगलाच गाजला होता. दरम्यान सायली संजीव काही महिन्यांपूर्वी 'पैठणी' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आली होती. तर आता यावर्षीही ती वैविध्यपूर्ण भूमिका साकारताना दिसणार आहे. नुकताच २०२१ साली प्रदर्शित झालेल्या आणि प्रचंड गाजलेल्या तिच्या 'झिम्मा' या चित्रपटाच्या दुसऱ्या भागाची घोषणा करण्यात आली.



# वयाबद्दलच्या प्रश्नावर ऐश्वर्या नारकर यांचा खुलासा

झी मराठी वाहिनीवरील 'सातव्या मुलीची सातवी मुलगी' मालिका सध्या चर्चेत आहे. या मालिकेमध्ये अभिनेत्री ऐश्वर्या नारकर नकारात्मक भूमिका साकारत आहेत. रुपाली राजाध्यक्ष हे त्यांचं मालिकेमधील पात्र प्रेक्षकांच्याही पसंतीस पडत आहे. मराठी सिनेसृष्टीतील एव्हरग्रीन अभिनेत्री म्हणून त्यांना ओळखले जाते. ऐश्वर्या नारकरने या वयाच्या पन्नाशीतही तितक्यात तरुण आणि फिटनेस फ्रीक दिसतात. नुकतंच एका मुलाखतीत त्यांनी त्यांच्या वयाबद्दल खुलासा केला आहे. ऐश्वर्या नारकर यांनी त्यांच्या अभिनयाच्या जोरावर प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले आहे. त्यांच्या सौंदर्याची भूरळ आजही लोकांना पडलेली असते. नुकतंच ऐश्वर्या नारकर यांनी एका मुलाखतीत त्यांच्या वयाबद्दल मोठे भाष्य केले आहे. त्यावेळी त्या म्हणाल्या, "माझी पन्नाशी उलटलेली नाही. सोशल मीडियावर माझ्या वाढदिवसाची तारीख चुकीची टाकलेली आहे. त्यामुळे त्यात थोडा घोळ होतो." "माझ्या आजूबाजूला असलेले अनेकजण मला माझ्या वयाबद्दल विचारताना दिसतात. ते मला सारखं सांगत असतात की आपलं वय इतकं नाही. पण ठिक आहे. मी पन्नाशीच्या जवळपास पोहोचले आहे. तुम्ही वयाच्या कुठल्याही स्टेजला असला तरी फिटनेस हा आयुष्यात महत्त्वाचा असतो.फिटनेस हा स्वत:ला प्रसन्न वाटावं, उत्साही वाटावं म्हणून करायचा असतो.`स हा आपल्या लाइफस्टाइलचा भाग असला पाहिजे. फक्त यावर्षीपासून करु हा संकल्प करण्यापेक्षा तो नियमित करायला हवा. मी वयाच्या १५ व्या वर्षापासून योगा करतेय. पण आता आता ते लोकांसमोर मी आणायला लागले", असे ऐश्वर्या नारकर यांनी सांगितले.

# घरच्या मैदानावर कर्णधाराची अग्निपरीक्षा!

## भारत आणि न्यूझीलंड यांच्यात 3 सामन्यांची टी-20 मालिका सुरु

। अहमदाबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील टी-२० मालिकेतील तिसरी आणि अंतिम मॅच ०१ फेब्रुवारीला अहमदाबाद येथे होणार आहे. तीन सामन्यांची मालिका १-१ अशी बरोबरीत आहे.**




भारत आणि न्यूझीलंड यांच्यात ३ सामन्यांची टी-२० मालिका सुरू आहे. पहिल्या २ लढतीनंतर मालिका १-१ अशी बरोबरीत असल्याने अखेरच्या लढतीला फायनलचे स्वरुप आले आहे. जो ही लढत जिंकले तो मालिका देखील जिंकले. दोन्ही संघात झालेल्या वनडे मालिकेत भारताने ३-० असा विजय मिळवला होता.

तिसरी आणि अखेरची टी-२० मालिका अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणार आहे. हे जगातील सर्वात मोठे क्रिकेट स्टेडियम आहे. उद्या होणाऱ्या मॅचच्या आधी या मैदानावरील रेकॉर्ड काय आहे ते जाणून घेऊयात.अहमदाबादमधील नरेंद्र मोदी क्रिकेट स्टेडियम आधी मोटेरा स्टेडियम या नावाने ओळखले जात होते. नंतर या स्टेडियममध्ये मोठ्या सुधारणा केल्या गेल्या आणि ते जगातील सर्वात मोठे मैदाना झाले. या मैदाावर आतापर्यंत ६ लढती झाल्या असून त्या सर्व लढतीत टीम इंडिया खेळली होती. सहा पैकी ४ लढती भारताने जिंकल्या तर २ मॅचमध्ये त्यांचा पराभव झाला. भारतानंतर या मैदानावर सर्वाधिक सामने इंग्लंडने खेळले आहेत. तर न्यूझीलंडने या मैदानावर एकही मॅच खेळली नाही.या मैदानावर २० मार्च २०२१ रोजी झाली होती. भारत आणि इंग्लंड यांच्यात झालेल्या लढतीत टीम इंडियाने प्रथम फलंदाजीकरत २ बाद २२४ धावा केल्या होत्या. उत्तरादाखल इंग्लंडला ८ बाद १८८ धावा करता आल्या. या मैदानावर मोठी धावसंख्या होऊ शकते. विजयासाठी किमान १७० ही चांगली धावसंख्या मानली जाते.

# खेळाडूंनी सकारात्मक वातावरणाचा लाभ घ्यावा : अनुराग ठाकूर

**भोपाळ :** गेल्या काही वर्षांत भारतातील क्रीडा वातावरण बदलले आहे. खेळाकडे बघण्याचा एक सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला आहे. खेळाडूंना काही कमी पडणार नाही. आम्ही तुमच्या पाठीशी सदैव आहोत, आता चमकदार कामगिरी करण्याची वेळ तुमची असल्याचे सांगत केंद्रीय क्रीडामंत्री अनुराग ठाकूर यांनी खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेसाठी आलेल्या खेळाडूंना साद घातली.

खेलो इंडिया क्रीडा स्पर्धाचे भोपाळ येथील तात्या टोपे क्रीडा संकुलात शानदार सोहळय़ात अनुराग ठाकूर यांच्या हस्ते व मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन झाले. यावेळी राज्याच्या क्रीडामंत्री यशोधरा राजे सिंधिया, केंद्रीय क्रीडा व युवक खात्याचे राज्यमंत्री नितीश प्रमाणिक हे उपस्थित होते



# पिंक सिटीनंतर आयपीएलचे आयोजन राजस्थानच्या ब्लू सिटीमध्ये!

## BCCI नियोजनासाठी पाठवणार टीम, आरसीबीचे काही सामने होणार

।ऑस्ट्रेलिया।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

आतापर्यंत फक्त आयपीएलचे सामने राजस्थानमध्ये आयोजित केले जात होते, परंतु २०२३ मध्ये इंडियन प्रीमियर लीगचे सामने दुसऱ्या शहरात खेळवले जाऊ शकतात. जोधपूरच्या बरकतुल्ला खान स्टेडियमवर पहिल्यांदाच आयपीएलचे सामने होण्याची शक्यता आहे. पिंक सिटीनंतर ब्लू सिटीमध्येही आयपीएलचा उष्मा पाहायला मिळू शकतो कारण राजस्थान रॉयल्सची फॅन फॉलोइंग चांगली आहे.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, जगातील सर्वात महागडी टी२० लीगही पहिल्यांदा जोधपूरमध्ये खेळवली जाऊ शकते. द इंडियन एक्स्प्रेसमधील वृत्तानुसार, राजस्थान क्रिकेट असोसिएशन (RCA) च्या उच्च पदाधिकाऱ्यांनी जोधपूरमधील काही आयपीएल सामन्यांचे यजमानपद भारतीय क्रिकेट नियामक मंडळाकडे (BCCI) सोपवण्याची मौखिक तयारी दर्शवली आहे. यावर लवकरच लेखी चर्चा सुरू होऊ शकते.



### बीसीसीआयची प्रमुख चिंता

**»आयपीएल सामना आयोजित करण्यासाठी स्थळासाठी काही मूलभूत सुविधा आवश्यक आहेत. तसेच, अहवालात असे म्हटले आहे की, “जोधपूरच्या मैदानासाठी बीसीसीआयची प्रमुख चिंता म्हणजे सीमारेषेचा आकार, जो त्यांना आवश्यक अंतरापर्यंत नाही असे वाटते. त्यामुळे बीसीसीआय स्थळाचे मुल्यांकन करण्यासाठी एक टीम पाठवेल, जी आयपीएल गव्हर्निंग कौन्सिलला आपला अहवाल सादर करेल.”**

बीसीसीआयच्या सूत्रांनी सांगितले की, “ही तोंडी विनंती आहे. आम्हाला सांगण्यात आले आहे की आरसीएने स्टेडियमचे नूतनीकरण केले आहे आणि आम्ही काही आयपीएल खेळांसाठी जोधपूरला नवीन ठिकाण म्हणून विचार करू शकतो का, असे विचारले आहे. RECCE संघ सादर केल्यानंतरच बोर्ड निर्णय घेईल. त्याचा अहवाल.” राजस्थान रॉयल्सने यापूर्वी गुवाहाटी येथेही त्यांचे सामने आयोजित केले होते.आयपीएल सामना आयोजित करण्यासाठी स्थळासाठी काही मूलभूत सुविधा आवश्यक आहेत. तसेच, अहवालात असे म्हटले आहे की, “जोधपूरच्या मैदानासाठी बीसीसीआयची प्रमुख चिंता म्हणजे सीमारेषेचा आकार, जो त्यांना आवश्यक अंतरापर्यंत नाही असे वाटते. त्यामुळे बीसीसीआय स्थळाचे मुल्यांकन करण्यासाठी एक टीम पाठवेल, जी आयपीएल गव्हर्निंग कौन्सिलला आपला अहवाल सादर करेल.”राजस्थान क्रिकेट असोसिएशनने (RCA) या हंगामात जोधपूरमध्ये काही प्रथम श्रेणी खेळांचे आयोजन केले होते. राजस्थानने जवळपास दोन दशकांनंतर छत्तीसगड आणि सर्व्हिसेस संघाचे यजमानपद भूषवले. याशिवाय, गेल्या वर्षी या ठिकाणी लेजेंड्स लीग क्रिकेटचे आयोजन केले होते, जे खचाखच भरलेल्या स्टेडियमसमोर दिव्याखाली खेळले गेले होते.

# भारत दौरा सुरू होण्यापूर्वी कांगारूंची आरडाओरड!

## विश्वास नाही म्हणून सराव सामना..., लावला अजब तर्क

।मुंबई । महाईन्यूज ।
वृत्तसंस्था ।

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात फेब्रुवारी-मार्चमध्ये चार सामन्यांची कसोटी मालिका होणार आहे. ऑस्ट्रेलियन संघ तब्बल सहा वर्षांनंतर भारतीय भूमीवर कसोटी मालिका खेळणार आहे. यापूर्वी, २०१७ मध्ये त्याने शेवटच्या वेळी कसोटी मालिकेत भाग घेतला होता, जिथे विराट कोहलीच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने २-१ ने मालिका जिंकली होती. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप (WTC) फायनलमध्ये पोहोचण्याच्या आणि कसोटी क्रमवारीत नंबर-१ येण्याच्या दृष्टीने ही मालिका खूप महत्त्वाची आहे. या मालिकेकडे सर्वांच्या नजरा खिळल्या आहेत. या महत्त्वाच्या मालिकेपूर्वी जल्लोषही सुरू झाला आहे. ऑस्ट्रेलियाचा माजी क्रिकेटपटू इयान हीलीने बीसीसीआयवर महत्त्वपूर्ण टिप्पणी केली आहे. वास्तविक, भारताविरुद्धची मालिका सुरू होण्यापूर्वी ऑस्ट्रेलियाचा संघ एकही सराव सामना खेळत नाहीये. याचे कारण असे सांगितले जात आहे की, बीसीसीआय सराव सामन्यासाठी वेगळ्या प्रकारची खेळपट्टी पुरवते, तर प्रत्यक्ष कसोटी सामन्यातील खेळपट्टीचे वर्तन पूर्णपणे वेगळे असते. अशा परिस्थितीत भारत दौऱ्याच्या तयारीसाठी उत्तर सिडनीमध्येच भारतीय खेळपट्ट्यांसारखी विकेट तयार करण्यात आली आणि संपूर्ण ऑस्ट्रेलियन संघाने त्यावर सराव केला.

